# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २४८/२०२४** **दिनांक-०१/०७/२०२४**

## "घरफोडी व वाहन चोरी करणाऱ्या २ आरोपींना अटक करुन एकुण ७ गुन्हे उघडकीस आणण्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश"

फिर्यादी नामे श्री. वेदप्रकाश काळुराम व्यास याचे गाळयामध्ये दिनांक १७/०६/२०२४ रोजी १४.०० ते दिनांक १८/०६/२०२४ रोजी १३.०० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने गाळा नं. ११९, पहिला माळा, धुरी इंडस्ट्रीयल इस्टेट नं. २, साईबाबा मंदिराजवळ, सातीवली, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथील भाडयाने दिलेल्या उघडया जागेत ठेवलेल्या प्लॅस्टीक वस्तु बनविण्याकरीता लोखंडी दोन डाय अं.कि.रु. ४०,०००/- हे तक्रारदार यांचे संमती शिवाय लबाडीच्या इरादयाने स्वतःच्या फायद्याकरीता चोरी करुन नेले म्हणुन वालीव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३२३/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात घरफोडी चोरी व मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी घरफोडी चोरी व वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले. श्री. उमेश माने-पाटील, सहायक उप आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनांनुसार वालीव पोलीस ठाणेचे सपोनि/सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सलग १० दिवस सि.सि.टी.व्ही. फुटेजच्या आधारे शोध मोहिम राबवुन आरोपींची माहीती प्राप्त केली व खानीवडे परीसरामध्ये सापळा रचुन आरोपी नामे १) आकाश रविंद्र कदम, रा. शिवभिम नगर, नाईकपाडा, मनसे पक्षाचे ऑफिस जवळ, वालीव, वसई पुर्व, जि. पालघर व २) साजन शिवराम वळवी, रा. शिवभिम नगर, नाईकपाडा, वसई पुर्व, जि. पालघर यांना ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपींकडे सखोल तपास केला असता त्यांनी वसई पुर्व परीसरातुन चोरी केलेल्या ३ मोटार सायकल, १ सायकल, सोन्याची दागिने व रोख रकमेसह इतर मुद्देमाल असा एकुण १,५९,९००/- **रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन ७ चोरीचे गुन्हांची यशस्वी उकल** करण्यात वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश आले आहे.

| अ.क्र. | गु.र.क्र. | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र. ३२३/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| २ | गु.र.क्र. ३०२/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ३ | गु.र.क्र. ३२२/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ४ | गु.र.क्र. ३०४/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | गु.र.क्र. ३२५/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ६ | गु.र.क्र. २८९/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ७ | गु.र.क्र. २९०/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/सचिन सानप, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, पो.ना. बाळु कुटे, पोअं/विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.




---------00000---------